युवाराष्ट्र दर्शन

# चंद्रपूर जिल्हा

गुरुवार दि.८ जानेवारी २०२६



## मतदान जनजागृती ; युवा वर्गाने सक्रिय सहभाग घ्यावा - आयुक्त अकुनुरी नरेश यांचे आवाहन

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.७ :** चंद्रपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी शहरातील सर्व महाविद्यालयांमध्ये मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. येत्या १२ जानेवारी - राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून, प्रत्येक महाविद्यालयातील युवावर्गाने विविध उपक्रमांच्या माध्यमातून मतदान जनजागृती कार्यक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन आयुक्त अकुनुरी नरेश यांनी केले. दि. ०६ जानेवारी रोजी चंद्रपूर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या शहरातील महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, लोकशाही अधिक बळकट करण्यामध्ये युवावर्गाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मतदानाचा हक्क बजावणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून, युवकांनी स्वतः मतदान करावे तसेच इतर नागरिकांनाही मतदानासाठी प्रेरित करावे. राष्ट्रीय युवा दिनानिमित्त महाविद्यालयांमध्ये रॅली, घोषवाक्य स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, मतदार शपथ, पथनाट्य, संवाद सत्रे आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या. या उपक्रमांमुळे प्रथमच मतदान करणाऱ्या मतदारांमध्ये जागरूकता वाढण्यास मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले.

या बैठकीस विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक तसेच महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते. सर्व महाविद्यालयांनी प्रशासनाला सहकार्य करून मतदान जनजागृती अभियान यशस्वी करण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले.

# भाजप महानगर अध्यक्षविना चंद्रपूर महानगर जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

## नागरिकांचे प्रश्न सुटतील व पक्ष संघटना बळकट करण्यासाठी कार्यालय महत्वाचे : ना.चंद्रशेखर बावनकुळे

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**



**चंद्रपूर दि.७ :** भाजप चंद्रपूर महानगर अध्यक्ष पद सध्या रिक्त असतानाच चंद्रपूर शहरात नव्या भाजप महानगर जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे हस्ते संपन्न झाले. मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे कार्यालय सुरू करण्यात आले असले, तरी अध्यक्षपद रिक्त आहे.महानगर अध्यक्षविना जनसंपर्क कार्यालय सुरु करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चा रंगू लागल्या आहेत.

नव्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन आमदार किशोर जोरगेवार, पालकमंत्री अशोक वुईके, अशोक नेते, व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पार पडले.मनपा निवडणुकीसाठी मतदारांशी थेट संपर्क साधणे, तक्रारी व सूचना स्वीकारणे तसेच प्रचाराचे नियोजन करण्यासाठी हे कार्यालय महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे उपस्थित नेत्यांनी सांगितले.या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न सुटतील व पक्ष संघटना बळकट करण्यासाठी हे कार्यालय महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास यावेळी ना. बावनकुळे यांनी व्यक्त केला.

मात्र, महानगर अध्यक्ष पद रिक्त असतानाच असे महत्त्वाचे कार्यालय सुरू होणे ही बाब अनेकांच्या भुवया उंचावणारी ठरली आहे. सामान्यतः अशा कार्यक्रमात महानगर अध्यक्षांची प्रमुख भूमिका असते; परंतु अध्यक्षाविनाच उद्घाटन झाल्याने पक्षातील संघटनात्मक स्थितीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.अध्यक्ष पदाबाबत कुठलीही स्पष्ट घोषणा किंवा अधिकृत माहिती देण्यात आली नाही.महानगर अध्यक्ष पद रिक्त असल्याने पक्षातील अंतर्गत मतभेद, गटबाजी आणि उमेदवार निवडीवरून निर्माण झालेला तणाव अजूनही कायम असल्याचे चित्र आहे. अध्यक्ष नियुक्ती कधी होणार, तसेच संघटनात्मक जबाबदारी कोण सांभाळणार, याबाबत कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम आहे.चंद्रपूर मनपा निवडणुकीत भाजपकडून एकसंघपणे लढा देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यकर्त्यांनी गटबाजी बाजूला ठेवून पक्षासाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

दरम्यान, लवकरच चंद्रपूर महानगर अध्यक्षाची नियुक्ती करण्यात येईल आणि संघटनात्मक जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तोपर्यंत अध्यक्षाविनाच जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन झाल्याची चर्चा चंद्रपूरच्या राजकारणात चर्चेचा विषय ठरत आहे.

### महानगर अध्यक्षपद रिक्तमूळे भाजप संघटनात्मक समन्वयाचा अभाव

चंद्रपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीचा रणसंग्राम सुरु असताना भाजप चंद्रपूर महानगर अध्यक्ष पद सध्या रिक्त आहे. प्रचार नियोजन, गटबाजी रोखणे आणि संघटनात्मक समन्वय या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले महानगर अध्यक्ष पद रिक्त असल्याने भाजपच्या निवडणूक व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महानगर अध्यक्ष पद रिक्त असल्यामुळे प्रचाराचे केंद्रीकृत नेतृत्व नसल्याची चर्चा पक्षाच्या अंतर्गत वर्तुळात सुरु आहे. प्रभागनिहाय समन्वय, कार्यकर्त्यांची जबाबदारी ठरवणे, नाराज इच्छुकांची मनधरणी तसेच मित्रपक्षांशी समन्वय साधणे ही सर्व कामे प्रामुख्याने महानगर अध्यक्षांच्या माध्यमातून होत असतात. मात्र सध्या ही जबाबदारी कोणावरच नसल्याने निवडणूक काळातील लहानसहान निर्णयप्रक्रियेत विलंब होत असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे.

दुसरीकडे, पक्षातील वरिष्ठ नेते आणि आमदारांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक लढवली जात असल्याचा दावा भाजपकडून करण्यात येत आहे. मनपा निवडणूक ही भाजपसाठी प्रतिष्ठेची लढाई मानली जात असताना संघटनात्मक पातळीवर असलेली ही पोकळी भरून काढणे पक्षासाठी मोठे आव्हान ठरणार आहे. महानगर अध्यक्ष पदाबाबत भाजप नेतृत्व नेमका काय निर्णय घेते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण उमेदवारांच्या प्रचारार्थ आज चंद्रपुरात



महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचा प्रचार अधिक धारदार करण्यासाठी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण उद्या ८ जानेवारी रोजी चंद्रपूर दौऱ्यावर येत आहेत. भाजपच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारासाठी ते शहरातील विविध प्रभागांना भेट देणार असून पक्षाच्या प्रचाराला बळ देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

दरम्यान, चंद्रपूर महानगर अध्यक्ष पद रिक्त असतानाच प्रदेशाध्यक्षांचा हा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या उमेदवार यादीत करण्यात आलेल्या बदलामुळे निर्माण झालेला वाद अद्यापही शमलेला नाही. या प्रकरणावर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण काय भूमिका मांडतात, याकडे चंद्रपूरसह राज्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.उमेदवार यादी बदलल्यानंतर पक्षात नाराजीचे सूर उमटले असून काही इच्छुक व कार्यकर्त्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे.उमेदवार यादी बदलण्याच्या नेमक्या निर्णयावर ते काय बोलतात, यावरच कार्यकर्त्यांची भूमिका ठरणार असल्याचे बोलले जात आहे.तसेच रिक्त महानगर अध्यक्ष पदावर कोणाची वर्णी लागणार याकडे सुध्दा कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

# जळका ग्रामसभेत देशी दारू दुकानाच्या एनओसी ला स्पष्ट हिरवी झेंडी

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**



**माढेळी (वरोरा) दि.७ :** गट ग्रामपंचायत जळका येथे दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी सरपंच सरिता सातपुते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेली ग्रामसभा ही गावच्या इतिहासातील अत्यंत निर्णायक ग्रामसभा ठरली. या ग्रामसभेचा एकमेव व केंद्रस्थानी असलेला विषय होता – गटग्रामपंचायत जळका अंतर्गत येणाऱ्या वडगावं येथे देशी दारूचे दुकान सुरू करण्यासाठी एन.ओ.सी. द्यायची का?

या मुद्द्यावर सकाळपासूनच ग्रामस्थांमध्ये उत्सुकता होती. दारू दुकानाचा विषय असल्याने ग्रामसभेला मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. चर्चेची सुरुवात होताच वातावरण तापले, मात्र बहुमताचा कल सुरुवातीपासूनच दारूच्या बाजूने स्पष्ट दिसत होता.

बहुमताचा जोर, लोकशाही निर्णय ग्रामसभेत दिपक शंकर जयस्वाल, सुरेश बाबुराव गुप्ता व महादेव लक्ष्मण आसूटकर यांनी दारूचे दुकान सुरू होणे हे ग्रामविकासाच्या दृष्टीने उपयुक्त असल्याची ठाम भूमिका मांडली.त्यांच्या भूमिकेला ग्रामसभेत उपस्थित बहुसंख्य ग्रामस्थांचा पाठिंबा मिळाल्याने, दारू दुकानास हरकत नसावी, असा ठळक बहुमताचा निर्णय समोर आला.'दारूचे दुकान अधिकृतरित्या सुरू झाल्यास ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वाढ होईल, गावासाठी अधिक विकासकामे करता येतील, तसेच बेकायदेशीर विक्रीला आळा बसेल,' असे मुद्दे बहुमताने मान्य केले.

विरोध झाला, पण बहुमत ठाम काही ग्रामस्थांनी सामाजिक कारणे देत विरोध नोंदवला, मात्र बहुमताचा कौल स्पष्ट आणि ठाम असल्याने विरोधकांचे मत अल्पसंख्याक ठरले.लोकशाही पद्धतीने मत मांडून निर्णय घेण्यात आला आणि बहुमताच्या निर्णयाला ग्रामसभेची मान्यता मिळाली.

ग्रामसभेत गाजले 'बहुमत' या ग्रामसभेत बहुमत हा निर्णायक घटक ठरला. चर्चेच्या प्रत्येक टप्प्यावर बहुसंख्य ग्रामस्थांचा कल दारूच्या दुकानाच्या बाजूने असल्याचे दिसून आले.शेवटी बहुमताच्या जोरावर दारू दुकानाला एन.ओ.सी. देण्याचा मार्ग मोकळा झाला.जळका गटग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वडगावं गावासाठी महत्त्वाचा निर्णय या निर्णयामुळे जळका गावात विकास, महसूलवाढ आणि नियंत्रित व्यवहार याबाबत नव्या अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.

बहुमताने घेतलेला हा निर्णय ग्रामपंचायतीच्या पुढील अधिकृत भूमिकेसाठी आधार ठरणार असून, या विषयाकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### जिल्ह्यात १५ जाने. ते ७ फेब्रु. दरम्यान सिकलसेल ॲनेमिया विशेष अभियान

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.७ :** जिल्ह्यात सिकलसेल ॲनेमिया विशेष अभियान १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार या अभियानासाठी जिल्हास्तरावर व्यापक पूर्वतयारी व नियोजन पूर्ण करण्यात आले आहे. सिकलसेल आजाराचा प्रतिबंध व नियंत्रण राखण्यासाठी या कालावधीत विशेष जनजागृती, तपासणी व समुपदेशन मोहीम राबविण्यात येणार आहे.४० वर्षापर्यंतच्या वयोगटातील सर्व नागरिकांची सिकलसेल तपासणी रुग्ण व वाहकाची नोंदणी आवश्यकतेनुसार इलेक्ट्रोफोरेसीस चाचण्या तसेच रुग्णांना उपचार व समुपदेशन देण्यात येणार आहे. भावी पिढीतील आजाराचे प्रमाण कमी करण्यासाठी विवाहपूर्व व प्रसूती पूर्व समुपदेशन सत्राचे आयोजन ही करण्यात येणार आहे.

### भद्रावतीत भव्य जागतिक पारायण सोहळ्याचे आयोजन

**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**



**भद्रावती दि.७ :** येथील जागतिक पारायण समिती यांच्या वतीने दिनांक ११ जानेवारी २०२६, रविवार रोजी मुर्लीधर पाटील गुंडावार लॉन येथे सकाळी ६ वाजता भव्य जागतिक पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यानिमित्त श्री संत गजानन महाराज यांच्या विजय ग्रंथाचे पारायण संपन्न होणार आहे.या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, पहाटे ५ वाजता श्रींचा अभिषेक होईल. त्यानंतर सकाळी ६ ते दुपारी ३ वाजेपर्यंत विजय ग्रंथाचे पारायण वाचन चालणार आहे.तत्पूर्वी, दिनांक १० जानेवारी २०२६, शनिवार रोजी दुपारी ४ वाजता मुर्लीधर पाटील गुंडावार लॉन येथून श्रींच्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ही पालखी शहरातील मुख्य मार्गाने मार्गक्रमण करणार आहे.पालखी सोहळा तसेच विजय ग्रंथ पारायणात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जागतिक पारायण समिती तर्फे करण्यात आले आहे.

# डॉ.खत्री महाविद्यालयात मतदार जनजागृती अभियान संपन्न

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**





**चंद्रपूर दि.७ :** स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीन चंद्रपूर शहर म.न.पा. शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार व सार्वत्रीक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभुमीवर मतदार जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले या अभियानाअंतर्गत निबंध स्पर्धा, पोष्टर स्पर्धा तसेच मतदान जनजागृती शपथ कार्यक्रम घेण्यात आला. 'माझे मत माझा अधिकार' या विषयावर विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग नोंदविला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे होते तर प्रमुख माग्रदर्शक म्हणून संस्थेच्या कोषाध्यक्षा प्राध्यापीका अनुश्री पाराशर सोबतच कनिष्ठ महाविद्यालयाचे विज्ञान शाखेचे प्रमुख डॉ. टि. एम. शेख, प्रा. हर्षल गायकवाड, प्रा. सुवर्णा राऊत यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य म्हणाले की मतदान हा लोकशाहीचा मजबुत आधार असुन प्रत्येक नागरीकांनी निर्भयपणे मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे. निंबध स्पर्धेत आणि पोष्टर स्पर्धेत उत्कृष्ठ सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीसे देऊन गौरविण्यात येतील. या प्रसंगी डॉ. टि. एम. शेख यांनी सुध्दा मौलीक असे माग्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी मतदान जनजागृतीची शपथ घेतली.

कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्राध्यापीका नाट यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापीका अर्चणा नागपूरे, तरफदार आणि इतरांचे सहकार्य लाभले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये तसेच पालकामध्ये मतदानाबाबत जागृती निर्मान झाली.

### ॲक्ट्रोसिटी प्रकरणातील वारसांना मिळणार जमीन

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.७ :** अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीच्या व्यक्तींवर जातीच्या कारणांवरून होणाऱ्या अत्याचारास पायबंद बसावा, या हेतूने केंद्र शासनाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ लागू केला आहे. सुधारीत नियम २०१६ मधील तरतूदीनुसार अधिनियमांतर्गत दाखल खून वा मृत्युच्या प्रकरणातील पिडीतास / कुटुंबास अर्थसहाय्य देण्यात येते व पुनर्वसन करण्यात येते.तसेच अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकाचे सबळीकरण व स्वाभिमान योजना सुरु करण्यात आली असून या योजनेत सुधारणा करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांच्या दारिद्रेरेषेखालील भुमिहीन कुटुंबाना कायमचे उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध व्हावे तसेच त्यांच्या राहणीमानात बदल व्हावा म्हणून त्यांना कसण्याकरिता चार एकर जिरायती किंवा दोन एकर बागायती जमीन खरेदी करून उपलब्ध करून द्यावयाची आहे.

### नागभीड ग्रामीण रुग्णालयास जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.७ :** नागभीड तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयास आज जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी भेट देऊन रुग्णालयातील व्यवस्थापनाचा आढावा घेतला व संबंधितांना सूचना दिल्या. रुग्णांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांचा दर्जा अधिक सक्षम करण्याबाबत त्यांनी आरोग्य यंत्रणेला मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी नागभीड येथे सुरू असलेल्या १०० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाच्या नवीन इमारत बांधकामाची पाहणी केली. तसेच सार्वजनिक विश्रामगृह इमारत बांधकाम आणि तहसील कार्यालय नागभीडच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामस्थळास भेट देऊन कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. संबंधित कार्यकारी अभियंता व कंत्राटदारांना इमारतींचे बांधकाम गुणवत्तापूर्ण व ठरलेल्या मुदतीत पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या.

तसेच झुडपी जंगल निर्वाणीकरण प्रस्तावाच्या अनुषंगाने नागभीड येथील स्मशानभूमी गट क्रमांक १२७/१ व कब्रस्थान गट क्रमांक ७१ येथील जागांची पाहणी करण्यात आली.

### आचारसंहिता अंमलबजावणीसाठी ४१ देखरेख पथके कार्यरत

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**



**चंद्रपूर दि.७ :** चंद्रपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने निवडणूक आचारसंहिता काटेकोरपणे अंमलात आणण्यासाठी चंद्रपूर महानगरपालिका प्रशासन व निवडणूक यंत्रणेमार्फत ४१ विविध देखरेख पथके कार्यरत ठेवण्यात आली आहेत.निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारचे आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये, तसेच बेकायदेशीर प्रचार, रोख रक्कम, मद्य, भेटवस्तू वितरण यांस प्रतिबंध घालण्यासाठी सकाळी ८ व संध्याकाळी ८ अशा एकूण १६ स्थायी निगराणी पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

तसेच तक्रार प्राप्त होताच तत्काळ कारवाई करण्यासाठी सकाळी ५ व संध्याकाळी ५ अशी एकूण १० फिरती पथके कार्यरत असून, प्रचार सभा, मिरवणुका व इतर निवडणूक कार्यक्रमाचे चित्रीकरण करण्यासाठी सकाळी ५ व संध्याकाळी ५ अशी एकूण १० व्हिडिओ देखरेख पथके कार्यरत आहेत.या व्हिडिओ चित्रीकरणाच्या माध्यमातून संकलित करण्यात आलेल्या चित्रफितींचे परीक्षण करून आचारसंहिता उल्लंघनाची प्रकरणे निष्पन्न करण्यासाठी ५ व्हिडिओ परीक्षण पथके कार्यरत ठेवण्यात आली आहेत. नागरिकांनी कोणत्याही प्रकारचे निवडणूक आचारसंहिता उल्लंघन निदर्शनास आल्यास तत्काळ संबंधित पथक किंवा निवडणूक प्रशासनाकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन मनपा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# वाहतुकीचे नियम पाळले तर अपघात कमी होण्यास मदत

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**



**चंद्रपूर दि.७ :** रस्ते अपघातात होणारे मृत्यु हे मानवनिर्मित आहे. अपघातांची संख्या आणि त्यात होणारे मृत्यु आपण नक्कीच कमी करु शकतो. मात्र त्यासाठी सर्वांनी वाहतुकीचे नियम पाळणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती, समाज, शासन आणि प्रशासन मिळून जिल्ह्यात अपघातांची संख्या कमी करू या, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, वाहतूक नियंत्रण शाखा आणि जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या वतीने जनता महाविद्यालय येथे रस्ता सुरक्षा अभियान - २०२६ चा शुभारंभ करतांना ते बोलत होते. यावेळी मंचावर मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, महानगरपालिका आयुक्त अकुनुरी नरेश, अतिरिक्त पोलिस अधिक्षक ईश्वर कातकाडे, प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, एस.टी. महामंडळाच्या विभागीय नियंत्रक स्मिता सुतवणे, महाविद्यायाचे प्राचार्य डॉ. आशिष महातळे आदी उपस्थित होते.

रस्ता सुरक्षा अभियानाचे महत्व वाढले आहे, असे सांगून जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, आज रस्त्यांची लांबी आणि रुंदी वाढली असून त्यावर वाहनांची संख्यासुध्दा मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे अपघातही वाढले. यात कुणी जखमी होतात तर कुणाला जीव गमवावा लागतो. भारतात दरवर्षी रस्ते अपघातात मृत्यु पडणा-यांची संख्या दीड लाखांच्यावर आहे. हे मृत्यु आपण नक्कीच रोखू शकतो. वाहतुकीचे नियम पाळले नाही तर अपघातांची संख्या वाढते, त्यामुळे सर्वांनी नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. रस्त्यावर अतिजलद जाणे टाळावे. आपले जीवन अमुल्य असून १ - २ मिनिटांमध्येसुध्दा आपला जीव जाऊ शकतो. त्यामुळे कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आपले मित्र, परिवारातील सदस्य व इतरांना वाहतुकीच्या नियमांबाबत जनजागृती करावी, जेणेकरून आपला जीव सुरक्षित राहू शकेल, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले.मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह म्हणाले, इतर कोणत्याही रोगापेक्षा अपघातात मृत्यु होणा-यांची संख्या जास्त आहे. रस्त्यावर सुरक्षित वाहन चालविणे, ही आपली जबाबदारी आहे. केवळ दंड आकारणे हे प्रशासनाचे ध्येय नाही तर जिवाची सुरक्षा महत्वाची आहे, असे त्यांनी सांगितले.

महानगरपालिका आयुक्त अकुनुरी नरेश म्हणाले, रस्ता सुरक्षा ही आपली जबाबदारी आहे. लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठीच प्रशासनामार्फत असे उपक्रम राबविले जातात. लोकांचा सहभाग वाढला तरच रस्ता सुरक्षा अभियान यशस्वी होईल.

अतिरिक्त पोलिस अधिक्षक म्हणाले, २०२४ पेक्षा २०२५ मध्ये अपघात आणि त्यात होणा-या मृत्युची संख्या ७ टक्क्यांनी कमी झाली. वाहन चालवितांना स्वयंशिस्त पाळली तर अपघातांची संख्या कमी होईल. अपघात झाला तर टोल फ्री क्रमांक १०८ किंवा ११२ वर त्वरीत कॉल करावा. विभागीय नियंत्रण स्मिता सुतावणे म्हणाल्या, परिवहन महामंडळाच्यावतीने सुध्दा रस्ता सुरक्षा अभियान राबविले जाते. बसमध्ये विनातिकिट कुणीही प्रवास करू नये. एस.टी.चे तिकीट म्हणजे आपला १० लाखांचा विमा असतो. एसटीच्या अपघातात अपंगत्व आले तर ७५ हजार ते ५ लक्ष रुपयांपर्यंत मदत दिली जाते, असेही त्यांनी सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ. महातळे यांनीसुद्धा मार्गदर्शन केले.


## :: कार्यालय नगर परिषद, ब्रम्हपुरी जि.चंद्रपूर ::

जा.क्र.नपब/आरोग्य/2026/11 **निविदा सुचना** दिनांक : 07/01/2026

सर्वसाधारण माहिती करीता निविदा सूचना प्रसिध्द करण्यात येते की, खालील नमूद कामाच्या निविदा योग्य त्या पंजीबध्द कंत्राटदार यांचे कडून निविदा प्रसिध्दी पासून दिनांक 16/01/2026 चे कार्यालयीन वेळेत मागविण्यात येत आहे.कोरे निविदा फार्म दिनांक 16/01/2026 पर्यंत कार्यालयीन वेळात रोखीने भरुन मिळू शकतील.प्राप्त निविदा शक्यतोवर दिनांक 19/01/2026 ला दुपारी 12:00 वाजता उपस्थित कंत्राटदार किंवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येईल.वरील कामाच्या बाबतीत अधिक माहिती व कामाच्या अटी शर्ती आरोग्य विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा प्रपत्र किंमत | अनामत रक्कम 1% | कंत्राटदाराचा वर्ग | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2.0 अंतर्गत जुन्या कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यासाठी बायोमायनिंग (Legacy Waste Remediation) | 5,50,000/- | रु.1000/- | 5500/- | अनुभवी कंत्राटदार | 180 दिवस |

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर परिषद, ब्रम्हपुरी

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
गुरूवार दि.०८ जानेवारी २०२६

## जिल्हा माहिती कार्यालयात दर्पणकारांना अभिवादन

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**भंडारा :** बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी, १८३२ रोजी महाराष्ट्रातील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' सुरु केले. हाच दिवस महाराष्ट्रात 'मराठी पत्रकार दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. त्याअनुषंगाने जिल्हा माहिती अधिकारी कायालय, जिल्हा नियोजन इमारत दुसरा माळा, भंडारा येथे मराठी वृत्तपत्राचे जनक आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस जिल्हा माहिती अधिकारी श्रीमती शैलजा वाघ-दांदळे व कार्यालयाचे कर्मचारी वर्ग यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.



यावेळी जिल्हा माहिती कार्यालयाचे विजय जाधव, बंडूसिंग राठोड, सुनिल फुलसुंगे, घनश्याम सपाटे, श्रीमती रेखा निनावे, या कार्यक्रमास उपस्थित होते.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# राईस मिल परिसरात लपविलेले १७ ट्रक जप्त

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**भंडारा :** तुमसर आणि मोहाडी परिसरात अवैध वाळू वाहतुकीवर कडक कारवाई सुरू असताना, पोलीस कारवाई पासून वाचण्यासाठी नागपूरकडे जाणारे वाळूचे १७ ट्रक चक्क एका राईस मिलमध्ये लपवून ठेवल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. राईस मिल परिसरात दडवून ठेवलेले हे १७ ट्रक महसूल विभागाने धाड टाकून जप्त केले आहेत.



भंडारा जिल्ह्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध प्रशासनाने आतापर्यंतची सर्वात मोठी आणि धडाकेबाज कारवाई केली आहे. जिल्हाधिकारी सावन कुमार यांच्या थेट निर्देशानुसार महसूल आणि पोलीस विभागाने संयुक्त मोहीम राबवून, वरठी येथील 'जय किसान राईस मिल' (मोहगाव देवी) परिसरात लपवून ठेवलेले १७ वाळूचे ट्रक जप्त केले आहेत. या कारवाईमुळे संपूर्ण जिल्ह्यातील राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

वाळूचे ट्रक मिल परिसरात दडविल्याची गोपनीय माहिती महसूल विभागाला मिळाली. या माहितीची गंभीर दखल घेत तुमसरचे उपविभागीय अधिकारी अंबादे आणि मोहाडीचे तहसीलदार यांनी तात्काळ संयुक्त पथकासह राईस मिलवर धाड टाकली. यावेळी तिथे अवैध वाळूने भरलेले १७ ट्रक आढळून आले. प्रशासनाने क्षणाचाही विलंब न लावता हे सर्व ट्रक ताब्यात घेतले.

तुमसर आणि मोहाडी परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याची माहिती जिल्हाधिकारी सावन कुमार यांना मिळाली होती. प्रशासकीय ससेमिरा चुकवण्यासाठी वाळू माफियांनी आपली वाहने सुरक्षित स्थळी दडवल्याचा संशय होता. जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ कारवाईचे आदेश दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा खनिज अधिकारी, तुमसरचे उपविभागीय अधिकारी अंबादे आणि मोहाडीच्या तहसीलदारांनी आज सकाळी ७:३० च्या सुमारास राईस मिलवर छापा टाकला.

तुमसर भागात सुरू असलेल्या कारवाईपासून वाचण्यासाठी १७ ट्रक 'जय किसान राईस मिल'च्या आवारात लपवून ठेवण्यात आले होते. नागपूरच्या दिशेने जाणारे हे ट्रक नाकाबंदी टाळण्यासाठी येथे उभे होते. मात्र, प्रशासनाने वेळेत छापा टाकून सुमारे ५८ लाख रुपये किमतीचा अंदाजित मुद्देमाल (वाळूसह ट्रक) जप्त केला. याव्यतिरिक्त, मोहाडी तहसीलदारांनी इतर ठिकाणी कारवाई करत आणखी ३ ट्रक पकडले, ज्यामुळे एकूण जप्त वाहनांची संख्या २० झाली आहे.

एका लोकप्रतिनिधीच्या व्यावसायिक प्रतिष्ठानाच्या परिसरात अशा प्रकारे अवैध वाळूचे ट्रक आढळल्याने आता या प्रकरणाला राजकीय वळण लागण्याची शक्यता असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या या भूमिकेचे सर्वसामान्य नागरिकांकडून कौतुक होत आहे.



# शेतकऱ्यांना न विचारता शेतात खोदकाम

## ■ आष्टीमध्ये जलसंपदा विभागाची मुजोरी
## ■ प्रशासनाच्या मनमानी कारभारामुळे ग्रामस्थ आक्रमक

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**नाकाडोंगरी :** तुमसर तालुक्यातील आष्टी परिसरात जलसंपदा विभागाच्या वतीने सुरू असलेल्या कामात अधिकाऱ्यांनी आणि कंत्राटदारांनी मनमानीचा कळस गाठला आहे. गावातील शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या सुपीक शेतजमिनीत थेट खोदकाम करण्यात आले असून, चक्क गावठाण रस्ताही उखडून टाकण्यात आला आहे. विशेष म्हणजे, यासंदर्भात ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगी घेण्यात आली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आष्टी शिवारात जलसंपदा विभागामार्फत काही विकासकामे प्रस्तावित आहेत. मात्र, ही कामे करताना संबंधित विभागाने साध्या सौजन्याची मर्यादाही पाळली नाही. शेतातील उभ्या पिकांची किंवा जमिनीची पर्वा न करता जेसीबीच्या साहाय्याने खोदकाम सुरू करण्यात आले. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीतून हे खोदकाम झाले, त्यांना साधी विचारपूसही करण्यात आली नाही. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

केवळ शेतीच नव्हे, तर गावातील वहिवाटीचा मुख्य गावठाण रस्ताही जलसंपदा विभागाने खोदून टाकला आहे. नियमानुसार कोणत्याही शासकीय कामासाठी स्थानिक ग्रामपंचायतीचा ना-हरकत दाखला किंवा पूर्वपरवानगी आवश्यक असते. मात्र, आष्टी ग्रामपंचायतीला कोणताही अर्ज न देता किंवा विश्वासात न घेता हा रस्ता खोदण्यात आला. यामुळे ग्रामस्थांच्या दळणवळणाचा प्रश्न गंभीर झाला आहे.

या प्रकारानंतर संतप्त ग्रामस्थांनी आणि शेतकऱ्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. अधिकाऱ्यांचे फोन सुरू असल्याचे दिसत असले, तरी ते जाणीवपूर्वक जनतेच्या फोनला उत्तर देत नसल्याचा आरोप होत आहे. प्रशासनाच्या या 'मुजोरी' मुळे कोणाकडे दाद मागायची? असा प्रश्न आष्टीवासीयांसमोर उभा ठाकला आहे.

कारवाईची मागणी

विनापरवानगी शेतीचे नुकसान करणाऱ्या आणि सार्वजनिक रस्ता उखडणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून तात्काळ भरपाई न मिळाल्यास जलसंपदा विभागाच्या कार्यालयावर धडक मोर्चा काढण्याचा इशाराही आष्टी येथील शेतकऱ्यांनी दिला आहे.

# पत्रकार हा प्रशासनाचा आरसा!

## तहसीलदार अंबादे तुमसर येथे पत्रकार दीन साजरा



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**तुमसर :** आरसा जसा चेहरा सुंदर आहे की विद्रूप आहे हे न लपवता दाखवतो, तसाच पत्रकार प्रशासनाचे खरे स्वरूप जनतेसमोर ठेवतो.

पत्रकाराच्या लेखणीमुळे प्रशासनाला स्वतःकडे पाहावे लागते, चुका दुरुस्त कराव्या लागतात आणि जनतेपुढे जबाबदार राहावे लागते. निर्भीड, निष्पक्ष आणि सत्यनिष्ठ पत्रकारिता प्रशासनाला योग्य दिशेने नेण्याचे काम करते. त्यामुळेच पत्रकार हा केवळ बातमी देणारा नसून लोकशाहीचा पहारेकरी आणि प्रशासनाचा आरसा आहे. असे प्रतिपादन तुमसर चे तहसिदार उपेश अंबादे यांनी केले.

तुमसर तालुका प्रेस वेलफेअर असोसिएशन तर्फे दी ६ जानेवारी रोजी येथिल हॉटेल पंचशील येथे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी नवनिर्वाचित नगराध्यक्ष सागर गभने, तुमसर पोलीस स्टेशन चे पोलिस निरीक्षक संजय गायकवाड, नगरसेवक नितीन धांडे, प्रेस वेलफेअर असो. चे प्रभारी अध्यक्ष राहुल डोंगरे उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचे ही मार्गदर्शन लाभले व त्यांनी पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य राहुल डोंगरे यांनी केले तर कार्यक्रमाचे संचालन प्रेस वेलफेअर असो. चे सचिव अनिल करेमोरे यांनी तर उपस्थितांचे आभार महेश गायधने यांनी मानले. कार्यक्रमाला गणेश बर्वे, देवचंद टेंभरे, सीताराम जोशी,जीवन वणवे, लालु चरडे, नवनीत जोशी, हर्षल खडसे, घनश्याम बडवाईक, संजय बडवाईक , शुभम देशमुख, राहुल भूतांगे, संजय नेमाडे आदी पत्रकार उपस्थित होते.

## आज 'एक जिल्हा एक उत्पादन उपक्रम' कार्यशाळा

**भंडारा :** एमएसएमई क्षेत्रावर भर देऊन त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे, राज्यात उद्योजकीय वातावरण व्यापक करून, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात निर्माण करणे, एक जिल्हा एक उत्पादन उपक्रम व निर्यातबुदधीस चालना देण्यासाठी तसेच उद्योगांच्या विकासासाठी केंद्र शासन व राज्य शासनांचे योजनांची माहिती एकाच व्यासपीठात उपलब्ध होण्याकरिता ८ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे.

# लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी निर्भिड पत्रकारीता करा - अशोक गुप्ता

## साकोलीत पत्रकार संघातर्फे ''दर्पणकार'' बाळशास्त्री जांभेकर जयंती व पत्रकार दिन साजरा

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**साकोली :** "सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी पत्रकारिता करावी. कारण सामान्य जनता ही मोठ्या आशेने लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाकडे पाहत असते. म्हणूनच पत्रकारांनी निष्पक्ष निर्भिड राहून लोकांना न्याय हक्कासाठी पत्रकारिता करावी" असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार अशोक गुप्ता यांनी केले. ते ( मंगळ. ०६ जाने.) ला दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिनी शासकीय विश्रामगृहात बोलत होते. येथे पत्रकार संघावतीने पत्रकार दिन साजरा करण्यात आला.



मराठीचे आद्य पत्रकार, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त साकोली तालुका पत्रकार संघातर्फे येथील विश्रामगृहात पत्रकार दिन साजरा करण्यात आला. प्रसंगी मंचावर प्रमुख अतिथी ज्येष्ठ पत्रकार अशोक गुप्ता, अध्यक्ष म्हणून तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष राजेशसिंह बैस, पत्रकार राजू दुबे हे होते. या पत्रकार दिनी ज्येष्ठ पत्रकार अशोक गुप्ता यांनी सांगितले की, पूर्वीची पत्रकारिता हे अतिशय खडतर होती, सायकलने प्रवास करावे लागत असे. परंतु आता ती पत्रकारिता सोपी असून डिजीटल मीडियाच्या माध्यमातून एका सेकंदात पोहोचविता येते. पत्रकारिता करायची असेल तर लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी पत्रकारिता करावी, कुणावर अन्याय होणार नाही यासाठी पत्रकारिता करावी. त्या पत्रकाराच्या माध्यमातून लोकांचे जनप्रबोधन कसे होईल, जनतेच्या न्याय हक्काविषयी कसे जागृत करता येईल यासाठी पत्रकारिता करून भ्रष्टाचाराची पोलखोल करता आली पाहिजे, भ्रष्टाचारी लोक माझे जवळचे संबंधित आहे म्हणून पत्रकारिता करून काम भागणार नाही, तर पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे, त्यांच्या लेखणीत दम आहे त्या लेखणीच्या वापर करून अन्याय अत्याचाराच्या विरोधात न्याय मिळवून द्यावे असे मत यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. प्रशांत शिवणकर यांनी केले तर आभार चेतक हत्तीमारे यांनी मानले. याप्रसंगी सर्वश्री पत्रकार डी. जी. रंगारी, प्रकाशराणा मेश्राम, सुदाम हटवार, सुनील जगिया, प्रा. ताराचंद कापगते, आशिष चेडगे, शाहेद कुरेशी, मनीषा काशिवार, संतोष कोरे, ऋग्वेद येवले इत्यादी पत्रकार बांधव प्रामुख्याने उपस्थित होते.

## तुमसरात बॅटरी चोरांचा धुमाकूळ

**तुमसर :** गोबरवाही पोलिस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या गोंडीटोला येथे चोरट्यांनी उच्छाद मांडला असून, एकाच रात्री पाच ट्रॅक्टरच्या बॅटरी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. या वाढत्या चोऱ्यांमुळे परिसरात शेतकरी आणि वाहनधारकांमध्ये कमालीची भीती पसरली असून पोलिसांच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला.गोंडीटोला येथील रहिवासी आशिष मानकर, सुधाकर कोरडे, नामदेव मुरारकर, काशीराम वाडीवे आणि उमेश कोरडे यांनी आपापले ट्रॅक्टर नेहमीप्रमाणे घरासमोरील अंगणात उभे केले होते. मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी संधी साधून या पाचही ट्रॅक्टरमधील बॅटरीवर हात साफ केला. सकाळी ही बाब लक्षात येताच खळबळ उडाली. केवळ गोंडीटोलाच नव्हे, तर परिसरातील रोंघा आणि बघेडा या गावांमध्येही त्याच रात्री अशाच चोरीच्या घटना घडल्या आहे. विशेष म्हणजे, गोबरवाही पोलिसांनी अवघ्या आठवड्याभरा पूर्वीच बॅटरी चोरणाऱ्या एका टोळीला अटक केली होती. या कारवाईनंतर चोऱ्यांचे सत्र थांबेल अशी अपेक्षा नागरिकांना होती मात्र ते स्वप्नच ठरीत आहे.

## अंगणात ठेवलेली दुचाकी चोरी

**भंडारा :** अंगणात ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना कारधा पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या डोडमाजरी येथे ईश्वर राजाराम वासनिक यांच्याकडे घडली. चोरी गेलेल्या दुचाकीच्या क्रमांक एम एच ३६ एपी ४८९७ असून त्याची किंमत ४० हजार रुपये सांगण्यात येते. तपास कारधा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक इंगळे करीत आहेत.

# मेरा युवा भारत व सशक्त युवा बहुउद्देशीय संस्थेअंतर्गत तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचा समारोप

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**भंडारा :** मेरा युवा भारत भंडारा, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार व सशक्त युवा बहुउद्देशीय संस्था, भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धा २०२६ दिनांक ५ व ६ जानेवारी २०२६ रोजी गाव कोरंभी येथे यशस्वीरीत्या पार पडल्या.

या स्पर्धांमध्ये पुरुष गटात कबड्डी, १०० मीटर धावणे व गोळा फेक, तर महिला गटात खो-खो, १०० मीटर धावणे व गोळा फेक या क्रीडा प्रकारांचा समावेश होता. या स्पर्धांना तालुक्यातील युवक-युवतींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कबड्डी (पुरुष) स्पर्धेत विजय क्रीडा मंडळ, भंडारा यांनी प्रथम, तर गणेश क्रीडा मंडळ, गणेशपूर यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.खो-खो (महिला) स्पर्धेत माणिकराव सुखदेव विद्यालय यांनी प्रथम, तर जय मां पिंग्लेश्वरी क्रीडा मंडळ, कोरंभी यांनी द्वितीय क्रमांक मिळविला.

१०० मीटर धावणे (पुरुष) मध्ये कार्तिक तलमले प्रथम, निशांत पुष्पटोडे द्वितीय व अनुप आतीलकर तृतीय क्रमांकावर आले.गोळा फेक (पुरुष) मध्ये महेश ढेकळे प्रथम, कार्तिक तलमले द्वितीय व दुर्गेश गभने तृतीय ठरले.१०० मीटर धावणे (महिला) मध्ये मयुरी मारवाडे प्रथम, नेहा सुपारे द्वितीय व काजल नेवारे तृतीय आल्या. गोळा फेक (महिला) मध्ये मृणाली कोंटागले प्रथम, मयुरी मानकर द्वितीय व सृष्टी रामटेके तृतीय आल्या.

या स्पर्धेतील पात्र खेळाडूंची पुढील जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. विजेत्या खेळाडूंना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला मेरा युवा भारत भंडाराचे जिल्हा युवा अधिकारी सुशील भड, निखिल बडगे, धरगावे, राखडे, लीचडे, तसेच आकाश फाले, अमित हुमने (ग्रामपंचायत सदस्य), आदित्य देवगडे, जयवंत तांडेकर, आश्विन सेलोकर, सिद्धार्थ हुमने, प्राची मस्के आदी मान्यवर उपस्थित होते.

# बाबा जुमदेवजींच्या विचारांचे तंतोतंत पालन करा - आ. परिणय फुके

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**खापा :** अंधश्रद्धेला मूठ माती देऊन बाबा जुमदेवजींच्या विचारांचे तंतोतंत पालन करा, त्यांनी दिलेले तत्व शब्द नियम अंगी करा व आपले जीवन सुखमय बनवा. असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री आमदार परिणयजी फुके यांनी खापा येथील भव्य सेवक संमेलनाच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना आपले मत व्यक्त केले.

खापा मांगलीच्या पटांगणावर परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळ नागपूर अंतर्गत भव्य दिव्य असे सेवक संमेलन पार पडले. यावेळी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी परमात्मा एक सेवक मंडळ नागपूरचे अध्यक्ष रवींद्रजी गायधने होते तर संमेलनाचे उद्घाटन रवींद्रजी खापरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ मार्गदर्शक जगन्नाथ सोनकुसरे, माजी अध्यक्ष राजूजी मदनकर, मंडळाचे उपाध्यक्ष देवरावजी तुमसरे, सुभाषजी दहेकर ईश्वरजी चिचगरे रमेशजी नकाते सेवक रामजी दिवटे सुधाकर नंदनकर ज्ञानेश्वर गद्रे जिल्हा परिषद सदस्य दिलीपजी सार्वे बाजार समिती संचालक राजकुमार माटे, विठ्ठल राव कॉल कर सरपंच कीर्ती ताई पिकलमुंडे, मांगलीचे सरपंच पंकज पारधी, मार्गदर्शक सुभाषजी ठवकर मार्गदर्शक देवाजी ठवकर, व समस्त 35 गावातील मार्गदर्शक कार्यकर्ता नागपूर चारगाव पारशिवनी शिंदे बाई

**खापा येथील भव्य दिव्य सेवक संमेलन संपन्न**



मळके जरा मोहगाव ठाणा तोंडली घाटकोरडा खापा मांगली परसवाडा तुडका तामसवाडी काटेबामणे हरदोली सालई, अशा प्रकारे परिसरातील १५ ते २० गावातील सेवक सेविका बालगोपालांचा समावेश होता. अंधश्रद्धा व व्यसनमुक्ती वर अधिक भर देऊन परमात्मा एक मार्गाच्या प्रचार व प्रसार व बाबा जुमदेवजी च्या आदेशानुसार मानवधर्माची चर्चा बैठक सेवक संमेलनामध्ये पार पाडण्यात आली.

या दरम्यान आलेल्या परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळ आजी-माजी संचालक व अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांचा सेवक बांधवांच्या वतीने शाल शिरफड देऊन सत्कार करण्यात आला, या सत्कारामध्ये व्यसनमुक्ती समितीचे अध्यक्ष व पत्रकार लीलाधर वाडीभस्मे, दैनिक भंडारा पत्रिकेचे पत्रकार काका भोयर, यांच्या सुद्धा मार्गदर्शक बालकदास ठवकर यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. सकाळपासून सुरू झालेल्या कार्यक्रमांमध्ये भव्य दिव्य अशा झाकी विविध प्रकारची रांगोळी स्पर्धा व वेगवेगळ्या प्रकारचे देखावे खापा परिसरातील सेवक बांधवांच्या वतीने प्रदर्शित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अक्षय बोंद्रे यांच्या युवा ग्रुप मार्गदर्शक बालकदास ठवकर, देवाजी ठाकर यादवराव लांजेवार सुभाष ठवकर शिवशंकर समरीत संजय महाकाडकर कैलास तिजारे विलास तिजारे विश्वनाथ ठवकर प्रेमनाथ ठवकर तारकेश्वर अतकारी लखपती ठवकर धमार्जी कन्फटे हेमंत मेहर गणेश शेंडे उपसरपंच हंसराज ठवकर रोशन मने, युवराज भोयर खुशाल भोयर विलास कनोजे हेमंत हलमारे, सेवकराम कडव मारुती मते मनोज शेंडे प्रभू द्याल पटले विक्रम लांजेवार, पराग भाजीपाले गिरधारी दमाहे, शैलेश आगासे सुरज पटले, दीपक ठवकर कृष्णा लेंडे, व परिसरातील सेवकांनी परिश्रम घेतले. सदर संमेलनाचे सूत्रसंचालन वसंत लिल्लारे मोहाडी , व रवींद्र कडव तिरोडा यांनी केले तर उपस्थितांचे आभार नागपूर मंडळाचे माजी संचालक संजय महाकाळकर यांनी केले. खापा येथे झालेल्या सेवक सामेलनामध्ये हजारोच्या संख्येने सेवक सेविका प्रामुख्याने उपस्थित होते. विशेष म्हणजे सेवकांनी तयार केलेल्या विविध प्रकारच्या झाख्या या संपूर्ण जिल्ह्यामध्ये केंद्रबिंदू ठरल्या यामध्ये खापा येथील सेवक बांधवांचे मोलाचे सहकार्य आहे.

## अभाविपचे ५४ वे विदर्भ प्रांत अधिवेशन गडचिरोली मध्ये

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि.७** :ढअखिल भारतीय विद्यार्थी परिषद, विदर्भ प्रांताचे ५४ वे प्रांत अधिवेशन दिनांक ०९, १० व ११ जानेवारी २०२६ रोजी भगवान बिरसा मुंडा नगर, सुमानंद सभागृह, आरमारी रोड गडचिरोली येथे आयोजित करण्यात आले आहे.

या अधिवेशनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विक. ासमंत्री अशोक उईके यांच्या हस्ते होणार असून, मुख्य अतिथी म्हणून नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महा. निरीक्षक आयपीएस संदीप पाटील तर अभाविपचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. विरेंद्रसिंह सोलंकी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सदर उद्घाटन दिनांक ९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११:४५ वाजता होणार आहे. गडचिरोलीच्या पावन भूमीवर पहिल्यांदाच विदर्भ प्रांताचे अधिवेशन होत आहे आणि हे अधिवेशन गडचिरोलीच्या इतिहासात ऐतिहासिक अधिवेशन ठरणार आहे.

हे प्रांत अधिवेशन विदर्भ प्रांताचे युवा तरुणाईला नवी ऊर्जा व दिशा देणारे ठरेल. या अधिवेशनात विदर्भाच्या १२० तालुके व ११९ मोठे सेंटर असे एकूण २३९ स्थानांवरून ३५० महाविद्यालयातून ५०० विद्यार्थी प्रति. निधी या अधिवेशनात सहभाग घेणार आहे. यावर्षी भगवान बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती वर्षानिमित्त असल्यामुळे या संपूर्ण अधिवेशन परिसराला जनजाति वीर म्हणजेच 'भगवान बिरसा मुंडा' यांच्या नाव अधिवेशन स्थळी उभारण्यात आलेल्या नगराला देण्यात आले आहे.

# लेखणी शाबूत राहिली तरच लोकशाही टिकेल - आ.विजय वडेट्टीवार

## पत्रकार दिनी आ.विजय वडेट्टीवार यांचा पत्रकारांना स्पष्ट संदेश




**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि.७** : समाजात टीका झालीच पाहिजे. पत्रकार आणि राजकारणी हे नेहमीच टीकेचे धनी असतात. लोकशाहीत सरकारच्या चुका उघड करणे हा पत्रकारांचा मूलभूत अधिकार आहे. मात्र कोणतीही बातमी लिहिताना तिची शहानिशा करून, तथ्य तपासूनच ती मांडली पाहिजे, ही जबाबदारी पत्रकारांनी कायम लक्षात ठेवावी, असे स्पष्ट मत काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केले. यशस्वी पत्रकारितेसाठी आपला सोर्स मजबूत ठेवा, असा मोलाचा सल्लाही त्यांनी पत्रकार दिनानिमित्त दिला.

गडचिरोली प्रेस क्लबतर्फे आयोजित जिल्हा गौरव पुरस्कार वितरण समारंभात ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. आपल्या आतापर्यंतच्या राजकीय वाटचालीत सर्वात मोठा वाटा पत्रकारांचाच असल्याची जाहीर कबुली देत वडेट्टीवार म्हणाले, "माझ्याबद्दल माध्यमांनी चांगल्या बातम्यांसोबत कधी टीकात्मक बातम्याही लिहिल्या. मात्र कोणत्याही निमित्ताने मला बातम्यांमध्ये ठेवून पत्रकारांनीच मला मोठे केले."

या समारंभात शैक्षणिक क्षेत्र, हॉटेलिंग व्यवसाय तसेच विविध सामाजिक उपक्रमांत भरीव योगदान देणारे अझिझ नाथानी यांना गडचिरोली जिल्हा गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. मंगळवारी सायंकाळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या वेळी आ. वडेट्टीवार पुढे म्हणाले, "लेखणी शाबूत राहिली तरच लोकशाही टिकेल. मात्र आज पत्रकारांच्या व्यथा मोठ्या आहेत. अनेक ठिकाणी मालकांकडून पत्रकारांचे शोषण होत आहे, ही वस्तुस्थिती आहे."

ते पुढे म्हणाले की, गडचिरोलीकरांमध्ये क्रीडा क्षेत्रासह प्रत्येक क्षेत्रात नाव कमावण्याची क्षमता आहे. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास हा जिल्हा नव्या उंचीवर जाईल. "कधीकाळी गडचिरोलीतून लोक बाहेर जात होते, आज मात्र बाहेरून लोक गडचिरोलीत येत आहेत," असे सांगत त्यांनी बदलत्या गडचिरोलीकडे लक्ष वेधले.

सत्कारमूर्ती अझिझ नाथानी यांच्याबद्दल बोलताना वडेट्टीवार म्हणाले, "मी प्रत्यक्षात विदेशात होतो. मात्र माझ्या छोट्या भावाप्रमाणे असलेल्या अझिझ नाथानी यांचा गौरव होत असल्याने हे निमंत्रण नाकारू शकलो नाही. त्यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करत अनेकांशी जिव्हाळ्याचे संबंध जोपासले आहेत. त्यांचा मला अभिमान वाटतो."

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ सहकार नेते अरविंद पोरेड्डीवार, आ.रामदास मसराम, नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रणोती निंबोरकर, जिल्हा माहिती अधिक. ारी गजानन जाधव, 'हिंदुस्तान टाइम्स'चे ज्येष्ठ पत्रकार प्रदीप मैत्र, माजी नगराध्यक्ष राम मेश्राम उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रेस क्लबचे अध्यक्ष मिलिंद उमरे होते.

अरविंद पोरेड्डीवार यांनी समाजाच्या प्रगतीत प्रसारमाध्यमांचे महत्त्व विशद केले. जिल्हा गौरव पुरस्कारासाठी नेहमीच योग्य व्यक्तीची निवड केली जाते, असे सांगत त्यांनी प्रेस क्लबचे कौतुक केले. तसेच नाथानी कुटुंबीयांनी गडचिरोलीच्या शैक्षणिक विकासात दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकला.

आ.रामदास मसराम व नगराध्यक्ष प्रणोती निंबोरकर यांनी पत्रकार दिन व पत्रकारितेच्या भूमिकेवर विचार मांडले. ज्येष्ठ पत्रकार प्रदीप मैत्र यांनी पत्रकारांसमोरील आव्हाने, अडचणी आणि त्यांच्या समस्यांवर भाष्य करत नागपुरात राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मिलिंद उमरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संध्या येलेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रेस क्लबचे उपाध्यक्ष रुपराज वाकोडे यांनी केले. सत्कारमूर्तीचा परिचय प्रेस क्लबचे सचिव शेमदेव चाफले यांनी करून दिला. सत्काराला उत्तर देताना अझिझ नाथानी यांनी गडचिरोलीकरांचे प्रेम असेच मिळत राहो, अशी भावना व्यक्त केली.

# अपुऱ्या आरोग्य सुविधांमुळे मृत्यू झालेल्या गरोदर मातेला न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेसचे धरणे आंदोलन'

## 'कावळ ॲम्ब्युलन्स' ची प्रतिकृती दाखवत काँग्रेसने केला जिल्ह्यातील आरोग्यवस्थेचा निषेध'



**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि.७** : गडचिरोली जिल्हा हा दुर्गम व मागास जिल्हा म्हणून ओळखला जातो. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्याचे पालकत्व स्वतःकडे ठेवून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न दाखवले असले, तरी प्रत्यक्षात आजही जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था व पायाभूत सुविधा पूर्णतः विकसित झालेल्या नाहीत. याचा फटका सर्वसामान्य गोरगरीब, कष्टकरी व आदिवासी नागरिकांना सहन करावा लागत आहे.

जिल्ह्यात दिवसेंदिवस अपुरे रस्ते व आरोग्य सुविधांच्या अभावामुळे दुर्घटना घडत असून नुकताच एका गरोदर मातेचा व तिच्या नवजात बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. ही घटना शासन व प्रशासनाच्या दुर्लक्षाचे जिवंत उदाहरण आहे.

तरीही राज्य शासन व प्रशासन याकडे गंभीरपणे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शासनाने तातडीने या प्रकरणाची दखल घेऊन जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था सक्षम व सुरळीत करावी, अतिदुर्गम भागांना जोडणारे रस्ते तयार करून वाहतूक व्यवस्था सुधारावी, तसेच मृत गरोदर मातेच्या कुटुंबाला न्याय व योग्य आर्थिक मदत द्यावी, अशी काँग्रेसची मागणी असून या मागण्यांसाठी गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने बुधवार, दिनांक ७ जानेवारीला दुपारी १२ वाजता इंदिरा गांधी चौक, गडचिरोली येथे जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांच्या नेतृवात धरणे आंदोलन करण्यात आले.

या धरणे आंदोलनादरम्यान 'कावळ ॲम्ब्युलन्स' ची प्रतिकृती दाखवत काँग्रेसने जिल्ह्यातील ढिसाळ आरोग्यवस्थेचा निषेध केला.

यावेळी गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे, माजी जि. प. उपाध्यक्ष मनोहर पा. पोरेटी, माजी नगराध्यक्ष काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रामभाऊ मेश्राम, शहराध्यक्ष तथा नगरसेवक सतीश विधाते, काँग्रेस ज्येष्ठ नेते वासेकर, गडचिरोली तालुका अध्यक्ष वसंत राऊत, आरमोरी तालुका अध्यक्ष मिलिंद खोब्रागडे, वडसा तालुका अध्यक्ष राजेंद्र बुल्ले, धानोरा तालुकाध्यक्ष प्रशांत कोराम, चामोर्शी तालुकाध्यक्ष प्रमोद भगत, नगरसेवक रमेश चौधरी, नगरसेवक श्रीकांत देशमुख, किसान सेल अध्यक्ष वामनराव सावसाकडे, पंचायत राज सेल अध्यक्ष माजी जि.प.सदस्य कविताताई भगत सह मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते पदाधिकारी महिला यावेळी उपस्थित होते.

## राहयोतून स्थानिक स्तरावरच रोजगार

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ७** : जिल्हाभरात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या कामाला सुरुवात झाली आहे. रोहयो कामामुळे स्थानिक स्तरावर रोजगार प्राप्त होत असल्याने या कामाला अधिक पसंती दिली जाते. यातही कामावर पुरुषांपेक्षा महिला मजुरांचीच संख्या अधिक दिसून येत आहे. खरीप हंगामातील कामे आटोपून शेतकरी, शेतकरी रोहो कामाला लागले आहेत. रब्बी हंगामात तूर, उडीद, मूग, लाखोळी आदी पिके घेतली जातात. या पिकाकडे पूर्ण वेळ द्यावे लागत नसल्याने घरातील कामे उरकून रोजगार हमी योजनेला पसंती दर्शवून कामाची मागणी करणारे अर्ज महिलांनी सादर केले आहे.

## हरविलेले ११ मोबाईल परत मिळाले




**तालुका प्रतिनिधी**

**कुरखेडा दि. ६** : कुरखेडा पो. लिस स्टेशनच्या हद्दीतून हरवलेले, चोरीला गेलेले २ लाख ४ हजार ५०० रूपयांचे तब्बल ११ मोबाइल संच एकूण कुरखेडा सायबर गुन्हे तपास चमूच्या वतीने छडा लावत ५ जानेवारी रोजी पोलिस स्टेशन येथे मूळमालकांना परत करण्यात आले.

कुरखेडा पोलिस स्टेशन येथील सीइआयआर पोर्टलच्या माध्यमाने हरवलेल्या मोबाइलचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले. यावेळी अनिल किरंगे रा. मेंढा, केशव कोसरे रा. नवरगांव, दुर्गावती बेले रा. जांभूळखेडा, अतूल राऊत रा. कुरखेडा, नीलकंठ राऊत रा.मालद. ूगी, अतूल कल्लो रा.धानोरी, रेखचंद बंसोड रा.वडेगांव, खेमराज राऊत रा.परसटोला, महेन्द्र जांभूळकर रा. तळेगांव, शिवशंकर ढवळे रा. घाटी, अंकीता निमजे रा. येरंडी यांचे हरवलेले, चोरीला गेलेले मोबाइल संच उपविभागीय पोलिस अधिकारी रवींद्र भोसले यांच्या हस्ते त्यांना परत करण्यात आले. याप्रसंगी ठाणेदार महेन्द्र वाघ, सायबर तपास चमू प्रमुख पोलिस उपनिरीक्षक संदीप ताराम, साहायक शिपाई पंकज नवघरे, अमोल आलाम, राकेश येरणे उपस्थित होते.

## शहराच्या समस्या सोडवण्यासाठी मी सदैव तत्पर

### नगराध्यक्ष लता सुंदरकर



**विशेष प्रतिनिधी**

**देसाईगंज दि.७** : येथील नुकत्याच सार्वत्रिक निवडणुकीत मध्ये नगराध्यक्ष पदाच्या लता मुरलीधर सुंदरकर यांनी विजय संपादन केले. आज दि.७ जानेवारीला नगर परिषद मध्ये नगराध्यक्ष पदाचा पदग्रहण समारंभ पार पडला. पदग्रहण समारंभाच्या वेळी माजी आमदार कृष्णा गजबे, भाजपाचे ज्येष्ठ नेते किसन नागदेवे, मुख्याधिकारी सतीश चौधरी, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष राजू जेठानी, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष तथा नगरपरिषद उपाध्यक्ष कुरखेडा बबलू हुसेनी, माजी उपाध्यक्ष मुरलीधर सुंदरकर, उद्योगपती आकाश अग्रवाल, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

प्रथमता नगर परिषद मध्ये पदग्रहणाच्या वेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या यांचा अर्धकृती पुतळ्याचे पूजन व मालार्पण करून नगराध्यक्ष लता मुरलीधर सुंदरकर यांनी पदभार स्वीकारला.

यावेळी नगराध्यक्ष लता सुंदरकर यांनी म्हटले की, शहरातील जनतेनी मला जो प्रेम दिला त्यांचा मी ऋणी असून शहराच्या विकासासाठी आणि जनतेच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी वरिष्ठांच्या मार्गदर्शनात कामे केली जातील. शहराच्या विकासाची दिशा, नागरिकांच्या समस्या पायाभूत सुविधा, स्वच्छता, आरोग्य आणि शिक्षणासाठी तसेच शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव तत्पर राहीन.

यावेळी पदभार स्वीकारताना नगरसेविका पल्लवी मुंठे, नगरसेवक नरेश विठ्ठलानी, पार्वता बेदरे, राहुल सतवानी, भावीका सादवाणी, विलास लोखंडे, बाळकृष्ण माडूलवार, सचिन खरकाटे, लता मुळे, ज्योत्स्ना लुटे, भारती कुथे, चौतनदास विधाते, युनूस शेख, पिंकू बावणे, विकास प्रधान, राधिका पत्रे, श्याम उईके, मंदा समर्थ, गुरमीत कौर चावला, आशा दहिवले, फैमिदा पठाण यांनी यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्ष यांचा स्वागत केला. यावेळी पक्षाचे कार्यकर्तेआणि शहरवासी यांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष त्यांचे स्वागत केले.

## ६८ रूग्णांना दारूमुक्तीसाठी समुपदेशन व उपचार

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ७** : जिल्ह्यातील रुग्णांना मोफत उपचार देण्याच्या उद्देशाने मुक्तीपथ अभियाना अंतर्गत विविध तालुका मुख्यालयात व्यसन उपचार शि. बिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिरांच्या माध्यमातून एकूण ६८ रुग्णांनी दारूचे व्यसन सोडण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी रुग्णांना योग्य समुपदेशन व उपचार देण्यात आले.

मुक्तीपथच्या या मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये एटापल्ली (१०), आरमोरी (१२), देसाईगंज (१७), कोरची (११), अहेरी (१०) आणि चामोर्शी येथील ७ रुग्णांनी या क्लिनिकचा लाभ घेतला. शिबिरादरम्यान तज्ज्ञ समुपदेशकांकडून रुग्णांना समुपद. ेशन देण्यात आले. केवळ शारीरिक उपचारच नव्हे, तर मानसिक रित्या व्यसनावर कशी मात करावी, याचे धडे देण्यात आले. दारूमुळे यकृत, हृदय आणि मानसिक आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम रुग्णांना पटवून देण्यात आले. तसेच, व्यसनामुळे कुटुंबाची होणारी आर्थिक आणि सामाजिक हानी या श्धोक्याच्या घटकांश्वरही प्रकाश टाकण्यात आला.दारूचे व्यसन हे केवळ एक सवय नसून तो एक आजार आहे, जो उपचाराने बरा होऊ शकतो. त्यामुळे व्यसन सोडण्यास इच्छुक असलेल्या जास्तीत जास्त रुग्णांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी पुढे येऊन उपचार घ्यावेत, असे आवाहन मुक्तीपथ चमूद्वारे करण्यात आले आहे.

## वांगेपल्लीत जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनी



**तालुका प्रतिनिधी**

**अहेरी दि. ७** : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे, प्रादेशिक विद्या प्राधिकरण नागपूर आणि शिक्षण विभाग जिल्हा परिषद गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने, अहेरी तालुक्यातील वांगेपल्ली येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांच्या शासकीय निवासी शाळेत जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख अतिथी म्हणून माजी कॅबिनेट मंत्री तथा अहेरी विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉ. धर्मरावबाबा आत्राम, माध्यमिक शिक्षणाधिकारी वासुदेव भुसे, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त डॉ.सचिन मडावी, प्राथमिक शिक्षणाधिकारी बाबासाहेब पवार, उपशिक्षणाधिकारी अमरसिंह गेडाम, डायटचे प्राचार्य बळीराम चौरे, गटशिक्षणाधिकारी सुनील आईंचवार, वांगेपल्लीचे सरपंच दिलीप मडावी, सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत मद्दीवार प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माध्यमिक शिक्षणाधिकारी वासुदेव भुसे यांनी केले. जिल्हाभरातून आलेल्या शेकडो बाल वैज्ञानिकांनी पर्यावरण, ऊर्जा बचत आणि आधुनिक शेती अशा विविध विषयांवर उत्कृष्ट मॉडेल्स सादर केले होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या कल्पकतेचे भरभरून कौतुक केले. विशेष म्हणजे तीन जानेवारी व चार जानेवारी रोजी सकाळी आलापल्ली अहेरी व या दोन्ही गावांमध्ये विज्ञान दिंडीचे आयोजन सुद्धा करण्यात आले होते. त्यामुळे अहेरी तालुक्यात विज्ञानमय वातावरण तयार झाले आहे. सदर विज्ञान प्रदर्शनीच्या आयोजनासाठी गटसाधन केंद्र अहेरी तसेच अहेरी आलापल्ली व परिसरातील शाळेतील शिक्षकांनी मुख्याध्यापक. ांनी केंद्रप्रमुख व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी अनु नैतामची निवड

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि.७** : पहिल्या पॅरा राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत येथील सेमाना बायपास रोडवरील शासकीय इंग्रजी माध्यम आश्रम शाळेची इयत्ता आठवीत शिकत असलेली अनु रघुपती नैताम हिने रौप्य पदक पटकाविले असून पटियाला (पंजाब) येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेकरिता तिची निवड झाली आहे.

महाराष्ट्र धनुर्विद्या संघटना व पिंपरी चिंचवड धनुर्विद्या संघटनेच्या संयुक्त विद्यमाने ३ जानेवारीला सी. एम. इंटरनेशनल स्कूल बानेर येथे पार पडलेल्या पहिल्या पॅरा राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत अनु रघुपती नैताम हीने इंडियन राउंड या प्रकारात वैयक्तिक रौप्य पदक पटकाविले. पदमश्री मुरलीकांत पेटकर यांच्या हस्ते रौप्य पदक देऊन तिचा गौरव करण्यात आला.

राज्य स्पर्धेत मिळालेले घवघवीत यश व राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल अनु रघुपती नैताम हिचे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोलीचे प्रकल्प अधिकारी अरुण एम. आदींनी अभिनंदन केले आहे.


## पाहिजेत

### - प्रत्यक्ष मुलाखत -

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी, ता.चामोर्शी, जि.गडचिरोली व्दारा संचालित सावित्रीबाई फुले उच्च प्राथमिक शाळा आष्टी, ता.चामोर्शी, जि.गडचिरोली.

(अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त) १००% अनुदानित या शाळेत प्राथमिक शिक्षण सेवकाचे रिक्त पद भरणे आहे. (दि.१३ जुलै २०१६ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने).

| अ.क्र. | पदाचे नांव | पदाची संख्या | शैक्ष./व्यवसायिक अर्हता | पद रिक्त होण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्राथमिक शिक्षण सेवक | १ | एच.एच.सी.डी.एड. टी.इ.टी.उत्तीर्ण | सेवानिवृत्तीमुळे |

संस्था अल्पसंख्यांक असल्यामुळे आरक्षण धोरण लागु होत नाही, तरी पात्र उमेदवारांनी सर्व मुळ कागदपत्रासह साक्षांकीत प्रतीसह स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित राहावे.

मुलाखतीचे स्थळ :- सावित्रीबाई फुले उच्च प्राथमिक शाळा आष्टी.

मुलाखत दिनांक :- २०/१/२०२६ रोज मंगळवार वेळ ११.०० ते ५.०० पर्यंत.

**मुख्याध्यापक**
**सावित्रीबाई फुले उच्च प्राथ.शाळा आष्टी**

**सचिव**
**आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी**



## -: अल्प मुदती निविदा सुचना :-

वनमजुर सहकारी औद्योगिक संस्था मर्या. अनखोडा र.नं.४१२४ स्थित कार्यालय अनखोडा या संस्थेच्या सभासदांना वितरण करण्याकरिता इत्तर किसम दिवाण पलंग खरेदी करावयाचे आहे.

२१८ नग इत्तर किसम दिवाण पलंग पुरवठा करण्यास इच्छुक पुरवठा धारकाकडून रेट कोटेशन दिनांक १३/०१/२०२६ ला दुपारी २.००० वाजेपर्यंत प्राप्त होतील अशा बेताने संस्थेचे कार्यालय अनखोडा येथे पाठवावी.

दिनांक १३/०१/२०२६ चे दुपारी २.०० वाजेपर्यंत प्राप्त होणाऱ्या कोटेशनचा विचार केला जाणार नाही.

टिपः- शर्ती व अटी संस्थेच्या कार्यालयात पहावयास मिळतील.

**सचिव**
**वनमजुर सह.औद्यो. संस्था मर्या.**
**अनखोडा र.नं.४१२४**

# पत्रकारांच्या समस्यांबाबत राज्यपालांची भेट घेणार - खासदार काळे

## पत्रकार संरक्षण समितींच्या वतीने पत्रकार दिनाचे आयोजन.!



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि. ०७

अन्यायला वाचा फोडण्याचे कामं करणारा ग्रामीण पत्रकार हा खऱ्या अर्थाने संत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेच्या विचारावर जगतो, ग्रामीण विकासासाठी पत्रकारांचा कायमच संघर्ष राहिलेला आहे. त्याकामी विधिमंडळात पत्रकारांचा प्रतिनिधी असणं आवश्यक आहे. त्या कामी मला आपले पत्र दया मी स्वतः राज्यपाल यांना भेटून हा प्रश्न तडीस नेण्यासाठी तुमच्या सोबत आहे. ग्रामीण पत्रकार हे गावपातळीवरील अडी-अडचणीचे जाणकार असतात, म्हणून मी त्यांना समाजाचे टॉनिक म्हणतो असे विचार खासदार अमर काळे यांनी मांडले.

पत्रकार संरक्षण समिती यांच्या संयोजनातून पत्रकार महर्षी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्मदिनानिमित्त कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. यावेळी विदर्भातील कृतिशील पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्यांचा गौरव शाल, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांच्या कार्याबद्दल गौरवं करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष विनोद पत्रे होते तर उदघाट्न खासदार अमर काळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मान्यवर म्हणून आमदार दादाराव केचे, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड, नगराध्यक्षा स्वाती गुल्हाने, शेतकरी आरक्षणाचे प्रणेते शैलेश अग्रवाल, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रकांत ढोले, तहसीलदार हरीश काळे, राज्य उपाध्यक्ष तथा कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते राम खुर्दळ, डॉ सय्यद मजीद, युवा पत्रकार आशिष घुमे, पत्रकार संरक्षण समिती वर्धाचे कार्याध्यक्ष सत्तार शेख, जिल्हाध्यक्ष शशांक चतारे, जिल्हा महिला अध्यक्ष उज्वला घोडे आदी मान्यवर व्यासपीठावर होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. व मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले.स्वागतानंतर अनेक स्वागतमूर्तिनी आपापले कार्य व पत्रकारितेतील अनुभवं मांडले. त्यानंतर आमदार दादाराव केचे म्हणाले की, बदलत्या काळात आपल्याकडून सर्वांनाच खूप अपेक्षा आहे. मात्र लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला ग्रामीण पत्रकारितेच्या कष्टाची जाणीव आहे'. पोलीस उपअधीक्षक चंद्रकांत ढोले यांनी सांगितले की 'पत्रकार समाज व सरकार यामधील दुवा आहे. लेखणीद्वारे तो सातत्याने उपेक्षिताचे मुद्द्याना वाचा फोडतो'. शेतकरी नेते शैलेश अग्रवाल म्हणाले, ग्रामीण पत्रकार हा शेतकरी, गाव खेड्यातील विद्यार्थी यांचे सारखा उपेक्षित घटक आहे, त्याला संरक्षण मिळणे आवश्यक बाब आहे.तत्पुर्वी पत्रकार दिनाचे मुख्य वक्ते, पत्रकार संरक्षण समितीचे राज्य उपाध्यक्ष राम खुर्दळ यांनी 'ग्रामीण पत्रकारितेचे आजचे वास्तव' विषयावर मांडणी करताना सांगितले की, पाच महिन्यांपूर्वी ग्रामीण पत्रकाराचे राज्यस्तरीय विचार संमेलनाची आठवण करून देतांना राज्यशासन, मंत्री आमदार खासदार यांना निवेदन दिले मात्र विषयांचे गांभीर्य अजूनही लोकप्रतिनिधीना समजले नाही. हिवाळी अधिवेशनात याबद्दल तारांकित मुद्दा उपस्थित केला नाही, अजूनही पत्रकार हल्लाविरोधी कायद्याचा लाभ ग्रामीण पत्रकाराना का नाही? वैयक्तिक व कौटुंबिक विमा, पेन्शन सरकार देत नाही,ग्रामीण पत्रकाराना अधिस्वीकृती मिळत नाही त्यासाठी जाचक अटी शर्ती आहेंत, ग्रामीण पत्रकारा वर हल्ले झाल्यास त्याला आधार नसतो मात्र बड्या पडस्थ पत्रकाराना ग्रामीण पत्रकार नेहमी आधार देतात. प्रास्ताविक ग्रामीण जिल्हाध्यक्ष संदिप रघाटाटे व संचालन प्रा. कल्याणी संजय वानखेडे यांनी केले. आभार तालुकाध्यक्ष प्रा. राजेश सोळंकी यांनी मानले. कार्यक्रमाला जिल्हा सचिव योगेश कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष जितू गोरडे, जिल्हा संघटक प्रशांत आजनकर, जिल्हा कोषाध्यक्ष सतिश काळे, जिल्हा सहसचिव इकबाल शेख, जिल्हा प्रवक्ते गजानन भोरे, जिल्हा महिला सचिव आरती कारंजेकर, जिल्हा सहसंघटक राहुल मून, प्रविण करोले, प्रशांत अवचट, तालुकाध्यक्ष संजीव वाघ, प्रा. प्रदिप झुटी, शिवाजी चंदीवाले, गजानन जिकार, विवेक हांडे, बाळू मुंगले, जगदीश कुर्डा, ओंकार दंडाळे, सय्यद सर व जिल्यातील पत्रकार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इकबाल शेख, पंकज गोडबोले, मनोज राऊत, टेकचंद मोटवानी, दिनेश सोळंके, नारायण घोडे यांनी परिश्रम घेतले.

# कार्यपालिका आणि पत्रकारितेच्या समन्वयातूनच शहराची प्रगती - नगराध्यक्षा डॉ.तुळसकर



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

हिंगणघाट, दि. ०७

पत्रकार हा समाजाचा आरसा असतो. पत्रकारांनी आपल्या लेखणीतून केवळ समस्या मांडण्याऐवजी जर विकासात्मक दिशा दिली, तर त्याचा कार्यपालिकेला प्रत्यक्ष कामात मोठा लाभ होतो. शहराच्या सर्वांगीण प्रगतीत पत्रकारांचा सहभाग मोलाचा असून, सर्वांच्या सोबतीने मी या शहराचे भविष्य नक्कीच घडवेन, असा ठाम विश्वास लोकनियुक्त नगराध्यक्षा डॉ. नयना तुळसकर यांनी व्यक्त केला. मराठी पत्रकार दिनानिमित्त आयोजित पत्रकार स्नेहमिलन आणि साहित्य गौरव पुरस्कार सोहळ्यात त्या मुख्य अतिथी म्हणून बोलत होत्या. आश्रय बेघर शहरी निवारा येथील वृद्धाश्रमासोबत हा पत्रकार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्रसिद्ध साहित्यिक, कवयित्री, वक्ता आणि सत्कारमूर्ती डॉ. मनीषा रिठे, नगर पालिका मुख्याधिकारी प्रशांत उरकुडे आणि तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मंगेश वणीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अजय मोहोड यांनी केले.

पत्रकार संघाच्या भवनासाठी आमदार समीर कुणावार यांनी ५० लाख रुपयांचा निधी नगरपरिषदला उपलब्ध करून दिला आहे. याविषयावर पत्रकारांनी उपस्थित नगराध्यक्ष डॉ नयना तुळसकर आणि मुख्याधिकारी प्रशांत उरकुडे यांना जागा उपलब्ध करून देत पत्रकारभवनाचे निर्माणकार्य तत्काळ सुरू करावे, अशी विनंती केला.

पाहुण्यांचा परिचय मंगेश वणीकर यांनी करून दिला.मानपत्राचे वाचन प्रभाकर कोळसे यांनी केले. संचालन राजेंद्र राठी यांनी केले.नरेंद्र हाडके यांनी आभार मानले.या कार्यक्रमाला शहरातील ज्येष्ठ पत्रकार विजय राठी, अनिल कडू, सतीश वखरे, अनिल अवस्थी, दशरथ ढोकपांडे, संजय अग्रवाल,अब्बास भाई, गजानन इंगळे,चेतन वाघमारे,प्रज्योत लिहितकर,मुकेश चौधरी,रवी येनोरकर, केशव तितरे, प्रमोद जुमडे, सैय्यद जाकिर , योगेश लखोटे आदी पत्रकार आणि नागरिक उपस्थित होते.

## डॉ. मनीषा रिठे यांना साहित्य गौरव पुरस्कार प्रदान

पत्रकार दिनाच्या निमिताने येथील साहित्यिक डॉ.मनीषा रिठे यांचा सत्कार नगराध्यक्ष डॉ नयना तुळसकर यांचे हस्ते करण्यात आला.सत्काराला उत्तर देताना डॉ. मनीषा रिठे यांनी सादर केलेल्या अंतर्मुख करणाऱ्या कवितेचा ओळी त्यांच्या सामाजिक जाणिवेची प्रचिती देतात. त्या म्हणाल्या समाजाचा आरसा म्हणून काम करणाऱ्या पत्रकारांमुळेच आम्हा साहित्यिकांना विषयांचे नवे संदर्भ मिळत असतात. बाळशास्त्री जांभेकरांनी ज्या निष्ठेने मराठी वृत्तपत्रसृष्टीची मुहूर्तमेढ रोवली, तीच निष्ठा आजच्या काळातही टिकवून ठेवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.लोकशाही 'व्हेंटिलेटर'वर असते, तेव्हा तिचे रक्षण करण्याची जबाबदारी पत्रकार आणि साहित्यिक या दोघांचीही असते. स्वातंत्र्याचे दावेदार तर अनेक आहेत, पण ते स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी लोकशाहीला पुनरुज्जीवित करण्याची गरज आहे, असे विचार डॉ.मनीषा रिठे यांनी व्यक्त केले.कार्यक्रमात नगरपरिषदचे मुख्याधिकारी प्रशांत उरकुडे यांनी मार्गदर्शन केले.यावेळी पत्रकार अजय मोहोड यांना डॉ.पंजाबराव देशमुख कृषीभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल तसेच महिला पत्रकार हर्षाली सातघरे, आश्रय बेघर शहरी निवाराचे अध्यक्ष लीलाधर मडावी, नगरसेवक दिनेश वर्मा यांचा सत्कार करण्यात आला.

# शिरपूर शिवारात मारहाणीत एक जण जखमी

**वर्धा, :** आर्वी तालुक्यातील शिरपूर शिवारात शेतातील पिकात बैल चारल्याचा आरोप करत मारहाण करण्यात आली, ही घटना १ जानेवारी रोजी घडली, याप्रकरणी आर्वी पोलिसांनी तक्रारीवरुन गुन्हा दाखल केला, शिरपूर येथील पुरवेश ठाकरे शेतात गेला असता सदाशिव डांगे यांच्यासोबत बोलत होता, दरम्यान, रामेश्वर दुर्गे याने शेतात बैल सोडल्याचे म्हणत पुरवेश ठाकरे यास मारहाण केली. आर्वी पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# मत्स्यमार अपघात विमा योजनेंतर्गत अर्थसहायाचे वाटप

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि. ७,

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत भूजलाशयीन पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन या प्रकल्पाचे लाभार्थी मृतक अनिल देविदास वहिले यांची वारसदार पत्नी जया अनिल वाहीले (गुंजी, तालुका धामणगाव, जिल्हा अमरावती) यांना प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत मच्छिमारांसाठी अपघात गटविमा योजनेतुन ५ लक्ष रुपयाचे अर्थसहाय्याची रक्कम बँक खात्यात वाटप करण्यात आली.



जिल्ह्यातील निम्न वर्धा जलाशयामध्ये प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत भूजलाशयीन पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन या प्रकल्पाचे लाभार्थी मृतक अनिल देविदास वहिले यांचा मत्स्य व्यवसाय विभागामार्फत विनामुल्य विमा काढण्यात आला होता. त्यांचा रेल्वे अपघातामध्ये मृत्यु झाला असल्यामुळे त्यांच्या वारसास ५ लक्ष रुपयाचे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले. जिल्ह्यातील मच्छिमार बांधवांनी अपघात गटविमा योजनेतून विमा काढण्यासाठी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयास भेट देऊन विमा काढून घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पोलिस विभागामार्फत जनजागृती कार्यक्रम



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि. ०७

महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन (रेझिंग डे) सप्ताहाचे औचित्य साधून पोलीस विभागातर्फे जिल्ह्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या हस्ते प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये वाहतूक शाखा, डायल ११२, सायबर सेल, शख प्रदर्शनी, श्वान पथक आणि बॉम्ब शोधक व नाशक पथकासह एकूण १० स्टॉल्स उभारण्यात आले होते. शहरातील ३४ शाळांमधील अंदाजे ३५०० विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांनी या प्रदर्शनीला भेट देऊन पोलीस दलाच्या कामकाजाची माहिती घेतली.

पोलीस भरती उमेदवारांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम आज पोलीस वर्धापन दिन सप्ताहाचाच एक भाग म्हणून, जिल्ह्यात पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या युवक-युवतीसाठी विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे दि. ०८रोजी सकाळी १० वाजता आशीर्वाद सभागृह, पोलीस मुख्यालय येथे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात पोलीस भरती प्रक्रियेतील विविध टप्पे, शारीरिक चाचणी आणि लेखी परीक्षेची तयारी कशी करावी, याबाबत पोलीस दलातील अनुभवी अधिकाऱ्यांमार्फत मार्गदर्शन केले जाणार आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी आशीर्वाद सभागृह येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी जिल्हा पोलीस दलातर्फे केले आहे.

# हिंदनगरातील गणेश मंदिरात आज महाप्रसाद



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि. ०७

विघ्नहर्ता श्री गणेशाच्या संकष्ट चतुर्थीच्या पावन पर्वावर हिंदनगर परिसरातील श्री गणेश मंदिरात आज गुरुवार ८ जानेवारी रोजी रात्री ७ ते १० वाजेपर्यंत भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रभाग क्रमांक १४ चे नवनियुक्त नगरसेवक संतोष ठाकूर व स्नेहा आकरे यांचा गणेश मंदिर देवस्थानच्या वतीने सत्कार करण्यात येणार आहे. लोकसेवेची जबाबदारी स्वीकारलेल्या लोकप्रतिनिधींना बाप्पाच्या सान्निध्यात सन्मानित करण्याचा हा सोहळा भाविकांसाठी विशेष ठरणार आहे.हिंदनगरचे श्री गणेश मंदिर हे परिसरातील श्रद्धेचे केंद्र असून संकष्ट चतुर्थीच्या दिवशी येथे मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. महाप्रसादाच्या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन देवस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# १५ जानेवारी रोजी राज्य क्रीडा दिनाचे आयोजन

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि. ७

भारतीय ऑलिंपिक पदक विजेते स्व. खाशाबा दादासाहेब जाधव यांच्या जयंती निमित्त क्रीडा व युवक सेवा संचालनालयांतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्यावतीने १५ जानेवारी रोजी राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात शैक्षणिक संस्था, क्रीडा संघटना व नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

क्रीडा संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले असून विविध क्रीडा स्पर्धा व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा गौरव क्रीडा दिन कार्यक्रम प्रसंगी करण्यात येणार आहे. खाशाबा जाधव यांच्या जिवनावर व्याख्यान तसेच तरुणांसाठी क्रीडा क्षेत्रातील करीअरच्या संधी या विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित शाळा, महाविद्यालये तसेच क्रीडा संघटनांनी आपल्या स्तरावर उपक्रम राबवून याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास सादर करावी, असे जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी कळविले आहे.

# पावसात-उन्हात झिजलेली पावले, तरीही न थांबलेली सेवा

## पत्रकार दिनी चौथा स्तंभ उभा करणाऱ्या मनोहर मुडके यांना मानाचा मुजरा



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि. ०७

पहाटेची शांतता, दारात पडणारे वृत्तपत्र आणि त्यामागे वर्षानुवर्षांची निःस्वार्थ मेहनत. पत्रकार दिनानिमित्त वर्धा श्रमिक पत्रकार संघाने अशाच कष्टकरी हातांना सलाम करत ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते मनोहर मुडके यांचा भावपूर्ण सन्मान केला. दादाजी धुनीवाले देवस्थान येथे झालेल्या 'चौथा स्तंभ पुरस्कार' वितरण सोहळ्यात हा गौरव सोहळा पार पडला.

या वेळी माजी खासदार रामदास तडस, ज्येष्ठ शेतकरी नेते विजय जावंधिया, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वडकर, ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र मुंढे, वृत्तपत्र विक्रेता संघाचे अध्यक्ष सुनील पाटणकर, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण धोपटे, तसेच ज्येष्ठ पत्रकार इकराम हुसेन, सुनील बुरांडे यांची उपस्थिती कार्यक्रमाची शोभा वाढवणारी ठरली. ७४ वर्षांचे वय गाठूनही मनोहर मुडके यांची सकाळ आजही वृत्तपत्रांच्या गठ्ठ्यानेच सुरू होते. गेली पाच दशके त्यांनी उन्हाची झळ, थंडीची बोच आणि पावसाची झोड सोसत घराघरांत बातम्या पोहोचवल्या. कुठलीही अपेक्षा न ठेवता केलेली ही सेवा म्हणजेच पत्रकारितेच्या चौथ्या स्तंभाची खरी ताकद असल्याचे मान्यवरांनी आपल्या भाषणातून अधोरेखित केले. वृत्तपत्र विक्रेते हे पत्रकार आणि वाचकांमधील जिवंत सेतू असून त्यांच्या कष्टांमुळेच समाज जागृत राहतो, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. मनोहर मुडके यांचा प्रवास हा पुढील पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचेही सांगण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी वर्धा जिल्हा वृत्तपत्र कल्याणकारी संघटनेचे गजानन मसने, संजय देवगीरकर, हर्षवर्धन नाखले, सुभाष मोतेवार, मोहन गिरडकर, सतीश मिसाळ, मोहन मसने यांच्यासह अन्य सभासदांनी टाळ्यांच्या गजरात मनोहर मुडके यांचे अभिनंदन केले. कष्ट, प्रामाणिकपणा आणि न थकणारी सेवा यांचे जिवंत प्रतीक म्हणून हा सन्मान कायम स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती.

# जिल्ह्यात सिकलसेल ॲनेमिया विशेष अभियान

## १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारीपर्यंत व्यापक तपासणी व जनजागृती मोहिम

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि. ०७

जिल्ह्यात १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीत सिकलसेल ॲनेमिया विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. अभियानादरम्यान सिकलसेल आजाराचा प्रतिबंध व नियंत्रण साधण्यासाठी विशेष जनजागृती, तपासणी व समुपदेशन मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेस यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी आरोग्य विभागास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले आहे.

अभियानादरम्यान ० ते ४० वर्षापर्यंतच्या वयोगटातील सर्व नागरिकांची सिकलसेल तपासणी, रुग्ण व वाहकांची नोंदणी, आवश्यकतेनुसार एचपीएलसी, इलेक्ट्रोफोरेसिस चाचण्या तसेच रुग्णांना उपचार व समुपदेशन देण्यात येणार आहे. भावी पिढीतील आजाराचे प्रमाण कमी करण्यासाठी विवाहपूर्व व प्रसूतीपूर्व समुपदेशन सत्रांचे आयोजनही करण्यात येणार आहे. ही मोहिम अधिक परिणामकारक करण्यासाठी जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्र व आयुष्यमान आरोग्य मंदिरांमध्ये आवश्यक मनुष्यबळ व तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जनजागृतीसाठी बॅनर, पोस्टर, पत्रके, सोशल मीडिया, गृहभेटी, शाळा-महाविद्यालयांतील सत्रे, प्रश्नमंजुषा, रांगोळी व निबंध स्पर्धा, महिला मंडळे आदी माध्यमांचा वापर केला जाणार आहे. ही मोहिम मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली राबविली जाणार आहे.

नागरिकांनी या विशेष मोहिमेचा लाभ घेऊन सिकलसेल तपासणी करून घ्यावी. आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आणि सिकलसेलमुक्त वर्धा जिल्हा घडविण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले यांनी केले आहे.

